महाराष्ट्र विधानपरिषद

तिसरे (हिवाळी) अधिवेशन, २०२५

अतारांकित प्रश्नोत्तरांची यादी

प्रश्नांची एकूण संख्या - २०

तारापूर (जि.पालघर) औद्योगिक क्षेत्रातील भूखंडावरील खाजगी सांडपाणी प्रक्रिया प्रकल्पात विनापरवानगी रासायनिक सांडपाणी साठवण करीत असल्याबाबत

(१) ११६ (२२-०४-२०२५) श्री.विक्रांत पाटील : सन्माननीय **पर्यावरण व वातावरणीय बदल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) तारापूर (जि.पालघर) येथील औद्योगिक क्षेत्रातील कारखान्यांमधून निघणाऱ्या सांडपाण्यातून उच्च सीओडी व डीटीएस घटक वेगळे करण्याची प्रक्रिया करण्यात येत असून सडेकर इनव्हिरो इंजिनिअर्स प्रा.लि. या खाजगी कंपनीने तारापूर औद्योगिक क्षेत्रातील ई-१३३ भूखंडावर विनापरवानगी सांडपाणी प्रक्रिया प्रकल्पात राबवून रासायनिक सांडपाणी साठवण केली असल्याची तक्रार स्थानिकांनी महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाकडे माहे डिसेंबर, २०२४ मध्ये वा त्यादरम्यान केली असल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर तक्रारीच्या अनुषंगाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्यानुषंगाने औद्योगिक क्षेत्रातील कारखान्यांमधून निघणाऱ्या सांडपाणी साठवण करण्याकरीता शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्रीमती पंकजा मुंडे (०७-१०-२०२५) : (१) व (२) हे खरे आहे.

महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाकडून प्राप्त अहवालानुसार मे. सडेकर इनव्हिरो इंजिनिअर्स प्रा. लि. या कंपनीला महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळामार्फत अटी शर्तीसह संमती पत्र प्रदान करण्यात आले होते.

महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाकडून प्राप्त अहवालानुसार मे. सडेकर इनव्हिरो इंजिनिअर्स प्रा. लि. या कंपनीने प्लॉट क्र. डी-८/१, येथील साठवणूक टाक्यामध्ये साठवणूक केलेल्या सर्व कच्चा माल (High COD/TDS) चे स्थलांतर/वाहतूक प्लॉट क्र. ई-१३३, ओ-२३ (पार्ट-१) येथील प्रक्रिया प्रकल्पात करुन त्याच्यावर प्रक्रिया केल्याचे व प्लॉट क्र. डी-८/१ येथील साठवणूक टाक्या रिकाम्या केल्याचे महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळास कळविण्यात आले होते.

तथापि, प्रसार माध्यमात सदरहू आस्थापना विना परवानगी औद्योगिक सांडपाण्याची साठवणूक करीत असल्याचे वृत्त व काही स्थानिक नागरीकांकडून प्राप्त तक्रारींच्या अनुषंगाने जिल्हाधिकारी, पालघर, महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळाचे व महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाचे अधिकारी आणि स्थानिक

तक्रारदार यांचे समवेत स्थळ पाहणी करण्यात आली होती.

सदर पाहणीदरम्यान आढळलेल्या त्रुटींच्या अनुषंगाने मे. सडेकर इनव्हिरो इंजिनिअर्स प्रा. लि. या कंपनीस महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाकडून दिनांक २७/१२/२०२४ रोजी अंतरीम आदेश बजावण्यात आले असून सदर उद्योगाची रुपये १.०० लक्ष रुपये इतकी बँक हमी जप्त करण्यात आली आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

संगमनेर नगरपालिकेच्या अमृतवहिनी नदी सुधार प्रकल्पास (ता.संगमनेर, जि.अहिल्यानगर) प्रशासकीय मान्यता मिळण्याबाबत

(२) २३४ (१७-०४-२०२५) श्री.सत्यजीत तांबे : सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) संगमनेर (जि.अहिल्यानगर) हे शहर मोठी बाजारपेठ असून शहरातील म्हाळुंगी नदीची व शहरातील प्रमुख रस्त्यांसह जोड रस्त्यांची मोठी दुरवस्था झाली असून संगमनेर नगरपरिषदेने महाराष्ट्र सुवर्ण जयंती नगरोत्थान महाभियानांतर्गत रुपये ३५० कोटी खर्चाचे अंदाजपत्रक मंजूर करून म्हाळुंगी, प्रवरा व आढळा या नद्यांचा अमृतवाहिनी नदी पुनरुज्जीवन आणि विकास प्रकल्पांतर्गतचा प्रस्ताव शासनास सादर केला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकल्पामुळे नदीचे संवर्धन, प्रदूषण नियमन व परिसंस्थेचे संतुलन राखण्यास मदत होणार असल्याने या प्रकल्पास मान्यता देण्याची विनंती प्रस्तुत लोकप्रतिनिधींनी मा.मंत्री, नगरविकास यांच्याकडे माहे जानेवारी, २०२५ मध्ये वा त्यादरम्यान केली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदरील प्रकल्पास महाराष्ट्र सुवर्ण जयंती नगरोत्थान महाभियानांतर्गत प्रशासकीय मान्यता देऊन निधी उपलब्ध करून देण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री.एकनाथ शिंदे (०७-११-२०२५) : (१), (२), (३) व (४) संगमनेर शहरातील नद्यांच्या सुशोभीकरण / संवर्धन करणेकामी सविस्तर प्रकल्प नगरपरिषदमार्फत तयार करण्यात आला आहे.

संगमनेर नगरपरिषद क्षेत्रातील प्रस्तुत प्रकल्पाचा प्रस्ताव नगरोत्थान महाभियानांतर्गत याबाबतची अनुज्ञेयता / पात्रता तपासून प्रस्ताव नगरपरिषद प्रशासन संचालनालयामार्फत विहित मार्गाने शासनास प्राप्त झाल्यानंतर प्रस्तुत प्रकल्पाच्या अनुषंगाने नागरी स्थानिक स्वराज्य संस्थेची स्वहिस्सा उभारण्याची आर्थिक स्थिती व राज्यातील इतर नागरी स्थानिक स्वराज्य संस्थांकडून या अभियानांतर्गत प्राप्त प्रकल्पांची मागणी या बाबी विचारात घेऊन याबाबत शासन स्तरावरील निर्णय घेण्यात येईल.

महाराष्ट्र राज्य गृहनिर्माण मंडळाचे उपाध्यक्ष यांच्या दालनात धक्काबुक्की झाल्याबाबत

(३) ३०२ (१७-०४-२०२५) श्री.शशिकांत शिंदे, श्री.एकनाथराव खडसे, श्री.अरुण लाड : सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) महाराष्ट्र राज्य गृहनिर्माण मंडळाचे उपाध्यक्ष यांच्या दालनात दिनांक २६ डिसेंबर २०२४ रोजी झालेल्या धक्काबुक्की विरोधात गुन्हा दाखल करण्यात आला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर रहिवाशाने म्हाडा उपाध्यक्ष यांनी मारहाण केल्याचा तसेच अन्य कर्मचाऱ्यांनी डांबून मारहाण केल्याचा आरोप केला असून सदर प्रकरणी शासनाने सखोल चौकशी केली आहे काय,
(३)असल्यास, चौकशीत काय आढळून आले आहे व त्यानुसार पुढे कोणती कार्यवाही केली आहे वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री.एकनाथ शिंदे (२८-१०-२०२५) : (१) उपाध्यक्ष तथा मुख्य कार्यकारी अधिकारी, महाराष्ट्र गृहनिर्माण व क्षेत्रविकास प्राधिकरण, मुंबई यांच्या दालनात कोणताही प्रकार घडलेला नसून त्यांच्या दालनाबाहेरील प्रतिक्षालयात झालेल्या धक्काबुक्कीविरुध्द खेरवाडी पोलीस स्टेशन येथे म्हाडा प्राधिकरणातील स्वीय सहायक श्रीमती प्रियंका चव्हाण यांनी प्रथम खबर अहवाल क्र. ०८१९ दिनांक १६/१२/२०२४ व श्री.विजय चाळके राहणार अंधेरी, मुंबई यांनी प्रथम खबर अहवाल क्र. ०८२० दाखल केला आहे.
(२) व (३) सदर प्रकरणी दोन गुन्हे दाखल करण्यात आले असून त्याबाबत पोलिसांमार्फत तपास करण्यात येत आहे.
(४)प्रश्न उद्‌भवत नाही.

येवला नगरपरिषद वाढीव पाणीपुरवठा प्रकल्पाच्या येसगाव साठवण तलाव उद्भव असलेल्या प्रस्तावास प्रशासकीय मान्यता मिळण्याबाबत

(४) ३६२ (१६-०४-२०२५) श्री.पंकज भुजबळ : सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) नगरोत्थान महाअभियानांतर्गत येवला नगरपरिषद वाढीव पाणीपुरवठा प्रकल्पाच्या येसगाव साठवण तलाव उद्भव असलेल्या प्रस्तावास प्रशासकीय मान्यता मिळणेसाठी जिल्हाधिकारी, नाशिक यांनी आयुक्त, नगरपालिका प्रशासन, नवी मुंबई यांना दिनांक १० सप्टेंबर, २०२४ रोजी वा त्यासुमारास प्रस्ताव पाठविलेला आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, मुख्य अभियंता महाराष्ट्र जीवन प्राधिकरण प्रादेशिक विभाग, नाशिक यांनी दिनांक ५ सप्टेंबर, २०२४ रोजी महाराष्ट्र सुवर्णजयंती नगरोत्थान महाअभियान अंतर्गत येवला वाढीव पाणीपुरवठा योजनेच्या रक्कम रुपये १६३.४२ कोटीच्या आराखडे व अंदाजपत्रकांना तांत्रिक मंजुरी दिलेली आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, येवला शहर पाणीपुरवठा योजनेच्या अंदाजपत्रके आराखड्यास प्रशासकीय मान्यता मिळण्यासाठी स्थानिक लोकप्रतिनिधी यांनी दिनांक २४ डिसेंबर, २०२४ रोजी वा त्यासुमारास मागणी केलेली आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, उपरोक्त प्रकरणी नगरोत्थान महाअभियान अंतर्गत येवला नगरपरिषद वाढीव पाणीपुरवठा प्रकल्पाच्या येसगाव साठवण तलाव उद्भव असलेल्या प्रस्तावास प्रशासकीय मान्यता मिळणेसाठी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री.एकनाथ शिंदे (०७-११-२०२५) : (१), (२), (३), (४) व (५) नगरोत्थान महाभियानंतर्गत येवला शहराचा पाणीपुरवठा प्रकल्पाचा प्रस्ताव नगरपरिषद प्रशासन संचालनालयामार्फत शासनास प्राप्त झाला आहे.

प्रस्तुत प्रकल्पाच्या अनुषंगाने नागरी स्थानिक स्वराज्य संस्थेची स्वहिस्सा उभारण्याची आर्थिक स्थिती व राज्यातील इतर नागरी स्थानिक स्वराज्य संस्थांकडून या अभियानांतर्गत प्राप्त प्रकल्पांची मागणी या बाबी विचारात घेऊन याबाबत शासन स्तरावरील निर्णय घेण्यात येईल.

राज्यातील दिव्यांग मुलांसाठी चार प्रवर्गात दिव्यांग निवासी शाळा चालविण्यात येत असल्याबाबत

(५) ७५१ (२२-०४-२०२५) श्री.अमित गोरखे : सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील दिव्यांग मुलांसाठी चार प्रवर्गात दिव्यांग निवासी शाळा चालविण्यात येतात हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या शाळांचा एकत्रित अभ्यासक्रम प्रवर्गनिहाय म्हणजेच अस्थिव्यंग,मतिमंद, मूकबधिर,अंध असा आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, यांच्या परीक्षा पध्दती कशा प्रमाणे घेतल्या जातात,

(४) नसल्यास, त्यांची रचना कोणती ?

श्री.देवेंद्र फडणवीस (२९-०८-२०२५) : (१) होय, हे खरे आहे.

राज्यामध्ये शासकीय संस्था व स्वयंसेवी संस्थांमार्फत अस्थिव्यंग, अंध, मूकबधीर व मतिमंद प्रवर्गासाठी शाळा, कर्मशाळा, प्रशिक्षण केंद, संलग्न वसतिगृहे, मतिमंद बालगृहे इत्यादी विशेष उपक्रम निवासी व अनिवासी स्वरुपात चालविले जातात.

(२) होय, हे खरे आहे.

(३) व (४) दिव्यांगांच्या विशेष उपक्रमांकरीता, दिनांक १८ जुलै, २०१८ व दिनांक ०५ फेब्रुवारी, २०१९ अन्वये सुधारित विशेष शाळा संहिता लागू करण्यात आली असून अस्थिव्यंग, मूकबधीर व अंध प्रवर्गाकरीता महाराष्ट्र माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण विभाग यांनी ठरविलेला अभ्यासक्रम राबविला जात असून मतिमंद प्रवर्गाकरीता प्रवेशित विद्यार्थ्यांचे शारीरिक व मानसिक वय तसेच बुद्ध्यांक विचारात घेऊन नॅशनल इन्स्टिट्यूट फॉर पर्सन्स विथ इंटेलेक्च्युली डिसेबल, सिकंदराबाद यांनी तयार केलेल्या मूल्यमापन व मुल्यांकन पध्दतीचा अवलंब करुन व्यक्तीगत अभ्यासक्रम दिशा अभियानामार्फत जानेवारी, २०१९ पासून शिकविला जातो.

सदर उपक्रमांमधील प्रवेशितांच्या परीक्षा ह्या लेखी व मौखिक पध्दतीने घेतल्या जातात.

गडचिरोली जिल्हा व अन्य भागातील नक्षलवाद संपुष्टात आणण्याबाबत

(६) १०९८ (२२-०४-२०२५) श्री.विक्रम काळे, श्री.अमोल मिटकरी : सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नक्षल चळवळीत ३८ वर्षे राहून सदस्य ते दंडकारण्य स्पेशल झोनल कमिटी सदस्य इत्यादी विविध पदावर राहून ६६ गुन्हे दाखल असणाऱ्या जहाल महिला माओवादी नेता व केंद्रीय समिती सदस्य भूपती यांच्या पत्नीसह अकरा जणांनी दिनांक १ जानेवारी, २०२५ रोजी वा त्यासुमारास शस्त्र खाली ठेऊन संविधान हाती घेऊन सन्मानाने जगण्याचा मार्ग स्वीकारला असल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, शासनाने घेतलेल्या या भुमिकेमुळे अन्य विकास कामे करण्यासाठी नक्षलवाद पूर्णत: संपला असल्याचे निदर्शनास आलक आहे, हेही खरे आहे काय,
(३) असल्यास, उक्त नक्षलवाद मोडीत काढण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री.देवेंद्र फडणवीस (२२-०९-२०२५) : (१) होय, हे खरे आहे.
(२) हे खरे नाही.
(३) व (४) नक्षलवाद मोडीत काढण्यासाठी गडचिरोली आणि गोंदिया पोलीस दल, विशेष अभियान पथक, विशेष कृती दल, एसआरपीएफ, सीआरपीएफ आणि जॉईन टास्क फोर्स मार्फत नक्षल प्रभावित भागांमध्ये नक्षल विरोधी अभियान पूर्ण क्षमतेने राबविले जात आहेत.

नक्षल प्रभावित भागांमध्ये रस्त्यांचा विकास, पूल बांधणी करुन जाळे निर्माण करणे, नविन पोलीस ठाणे, पोलीस मदत केंद्र सुरु करुन विविध कल्याणकारी शासकीय योजना अतिदुर्गम भागातील नागरिकांपर्यंत पोहचविण्यासाठी गडचिरोली आणि गोंदिया पोलीस दल नागरी कृती शाखेच्या माध्यमातून प्रभावी काम करीत आहेत.

गडचिरोली व गोंदिया जिल्ह्यात नवीन व्यवसाय, उद्योगधंदे, खाण उघडण्यात आलेले असून त्यातून स्थानिकांना प्राधान्य देवून रोजगार उपलब्ध करुन देण्यात आलेला आहे.

दुर्गम भागात मोबाईल टॉवर उभारणीस मदत करुन दुर्गम भागांना मोबाईल कनेक्टीविटीद्वारे जोडले जात आहे. गडचिरोली आणि गोंदिया पोलीस दलाने आत्मसमर्पण योजना प्रभावीपणे राबवून अत्यंत जहाल माओवाद्यांना आत्मसमर्पण करण्यास भाग पाडले आहे. आत्मसमर्पण केल्यानंतर आत्मसमर्पित माओवाद्यांना राहण्यासाठी हक्काचे घर व भुखंड मिळावे याकरीता महसूल विभागास पत्रव्यवहार करुन पाठपुरावा केला जातो. भुखंड मिळाल्यानंतर जिल्हा परीषद तसेच पंचायत समिती येथे पत्रव्यवहार करुन आत्मसमर्पित माओवाद्यांना घरकुलासाठी पाठपुरावा करण्यात येतो. त्यांनतर आत्मसमर्पित माओवाद्यांनी उदरनिर्वाहासाठी स्वयंरोजगार उभा करुन त्यांचे जीवनमान उंचविण्यासाठी नागरी कृती शाखेद्वारे त्यांना विविध व्यावसायिक प्रशिक्षण दिले जाते.

सन २०२२ पासून ४ वर्षांमध्ये गडचिरोली जिल्ह्यात ५९४ मोबाईल टॉवर मंजूर असून त्यापैकी ५०२ मोवाईल टॉवरचे काम पूर्ण झाले आहे व ७४ मोबाईल टॉवरचे काम प्रगतीपथावर आहे. तसेच गोंदिया घटकात मंजूर असलेल्या ३३ टॉवरचे काम पूर्ण करण्यात आले आहे.

गडचिरोली घटकात फेज-१, फेज-२, व फेज-४ अंतर्गत २६ रोड मंजूर असून त्यापैकी १९ रोडचे बांधकाम पूर्ण झालेले आहे व ८ पुलांचे बांधकाम प्रगतीपथावर आहे. तसेच गोंदिया घटकात ०२ रोड मंजूर असून बांधकाम पूर्ण झालेले आहे.

गडचिरोली पोलीस दलामार्फत राबविण्यात येणाऱ्या पोलीस दादालोरा खिडकीच्या माध्यमातून आजपर्यंत नक्षलग्रस्त संवेदनशील भागातील १० लक्ष तसेच गोंदिया पोलीस दलामार्फत ०२ लक्ष सामान्य नागरिकांना शासनाच्या विविध कल्याणकारी योजनांचे लाभ मिळवून देण्यात आलेले आहेत.

कृषी आयुक्तालयातील फलोत्पादन विभागातील उपसंचालकावर लाचलुचपत प्रतिबंधक विभागाने केलेल्या कारवाईबाबत

(७) ११०५ (१५-०४-२०२५) श्री.योगेश टिळेकर : सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) कृषी आयुक्तालयातील फलोत्पादन विभागातील उपसंचालक यांच्यावर गैरव्यवहार प्रकरणात निलंबित केलेल्या कर्मचाऱ्याकडून अडीच लाख रुपयांची लाच घेतल्याप्रकरणी कारवाई केल्याची घटना माहे जानेवारी, २०२५ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, अमरावतीतील कृषी सहसंचालकांनी निलंबित केलेल्या कर्मचाऱ्याला निलंबन कालावधीत मदत करणे तसेच तक्रारदाराविरोधात घेण्यात आलेल्या आक्षेपांविरोधात मदत करण्यासाठी लाच मागितली होती, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, शासनाने उपरोक्त प्रकरणी चौकशी करुन संबंधित दोषी अधिकाऱ्यांवर कारवाई करण्याच्या दृष्टीने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री.देवेंद्र फडणवीस (२८-१०-२०२५) : (१) व (२) होय, हे खरे आहे.

तक्रारदार तथा कनिष्ठ लिपिक यांच्या शासकीय कामकाजातील कसुरीच्या अनुषंगाने करण्यात आलेले निलंबन मागे घेणे व सदर प्रकरणी एफ. आय.आर. दाखल न करणे यासाठी आरोपी लोकसेवकांनी तक्रारदार यांच्याकडून अडीच लाख रुपयांची लाचेची रक्कम स्विकारली म्हणून येरवडा पोलीस स्टेशन येथे दिनांक ११/०१/२०२५ रोजी गु. र. क्र. २३/२०२५, भ्रष्टाचार प्रतिबंध अधिनियम, १९८८ चे कलम ७ अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

(३) सदर प्रकरणी संबंधित अधिकाऱ्यांविरुध्द विभागीय चौकशीची कार्यवाही सुरु करण्यात आली असून एका आलोसे विरुध्द मा.न्यायालयात अभियोग दाखल करण्याची परवानगी देण्यात आली आहे.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

नागपूर येथील खिंडसी या ठिकाणाचा पर्यटनदृष्ट्या विकास करण्याबाबत

(८) २०६७ (२३-०४-२०२५) श्री.अभिजित वंजारी, श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप, श्री.सतेज ऊर्फ बंटी पाटील, डॉ.प्रज्ञा सातव, श्री.राजेश राठोड, श्री.जयंत आसगावकर, श्री.धीरज लिंगाडे, श्री.सुधाकर अडबाले : सन्माननीय **पर्यटन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) रामटेक (जि.नागपूर) तालुक्यातील २० कि.मी. घनदाट जंगलाने व्यापलेले खिंडसी हे ठिकाण पर्यटनदृष्टया विकासाच्या प्रतिक्षेत असल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, खिंडसी येथील पर्यटनाच्या विकासासाठी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री.शंभूराज देसाई (११-१०-२०२५) : (१) होय, हे खरे आहे.
(२) रामटेक तालुक्यातील खिंडसी जलाशय २० वर्षाच्या लिजवर जलपर्यटनासाठी पेंच, पाटबंधारे विभागामार्फत मे. राजकमल टुरिस्ट कॉम्लेक्स यांना देण्यात आले आहे. प्रादेशिक पर्यटन विकास योजनेंतर्गत खिंडसी येथील पर्यटन विकासाबाबत जिल्हाधिकारी, नागपूर यांच्याकडून पर्यटन संचालनालयामार्फत विहित नमुन्यात परिपूर्ण प्रस्ताव प्राप्त झाल्यानंतर प्रस्तावास मान्यता देण्याबाबत पुढील नियमोचित कार्यवाही करण्याचे प्रस्तावित आहे.
(३) प्रश्न उद्भवत नाही.

चंद्रपूर महानगरपालिका हद्दीतील रस्त्यांची दुरवस्था झाल्याबाबत

(९) २०७१ (१७-०४-२०२५) श्री.सुधाकर अडबाले, श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप, श्री.अभिजित वंजारी, श्री.धीरज लिंगाडे, श्री.सतेज ऊर्फ बंटी पाटील, श्री.राजेश राठोड : सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) चंद्रपूर महानगरपालिकेने अमृत २ व भूमिगत गटार योजना अंमलात आणताना संपूर्ण चंद्रपूर शहरातील मुख्य रस्त्यांसह इतर रस्त्यांची दुरवस्था झाल्याची बाब माहे जानेवारी, २०२५ च्या दरम्यान निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, वाहतूकदारांना व नागरिकांना रस्त्याच्या दुरवस्थेमुळे अनेक समस्यांना सामोरे जावे लागत असूनही स्थानिक प्रशासनाचे दुर्लक्ष होत आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, सदर प्रकरणी शासनाने चौकशी करुन चंद्रपूर महानगरपालिका हद्दीतील तसेच इतर रस्त्यांची दुरवस्था सुधारण्यासाठी कोणती कार्यवाही वा उपाययोजना केली आहे वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री.एकनाथ शिंदे (०७-११-२०२५) : (१), (२), (३) व (४) केंद्र पुरस्कृत अमृत २.० अंतर्गत चंद्रपूर शहरातील पाणीपुरवठा व भुयारी गटार प्रकल्पास प्रशासकीय मंजुरी प्रदान करण्यात आलेली असून सद्य:स्थितीस दोन्ही प्रकल्पांची कामे प्रगतीपथावर आहेत.

चंद्रपूर शहरातील मुख्य रस्ते गांधी चौक ते प्रियदर्शनी चौक, प्रियदर्शनी चौक ते गिरणार चौक, गिरणार चौक ते गांधी चौक आणि हॉटेल सेलेब्रेशन ते रामसेतु ब्रिज पर्यंत अमृत योजना तसेच, भुयारी गटार योजनेंतर्गत फोडण्यात आलेल्या रस्त्यांचे दुरुस्तीकरण करण्यात आलेले आहे.

तसेच, अमृत २.० अंतर्गत दोन्ही प्रकल्पांची कामे प्रगतीपथावर असल्यामुळे ज्या भागात रस्त्यांची कामे प्रगतीपथावर आहेत त्याठिकाणी फोडण्यात आलेल्या रस्त्यांची दुरुस्ती करण्यात येत असल्याचे चंद्रपूर महानगरपालिकेने कळविले आहे.

पीओपीसारखे साधर्म्य असलेले साहित्य उपलब्ध करून देण्याबाबत

(१०) २११६ (२३-०४-२०२५) श्री.सुनिल शिंदे, श्री.सचिन अहिर, श्री.हेमंत पाटील : सन्माननीय **पर्यावरण व वातावरणीय बदल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्य शासनाने प्लास्टर ऑफ पॅरिसला पर्याय म्हणून पीओपीसारखे साधर्म्य असलेले साहित्य उपलब्ध करून द्यावे आणि त्यानंतरच पीओपीवर बंदी घालण्याचा निर्णय घ्यावा, अशी मागणी गणेश मूर्तीकार संघटनेने मा.मुख्यमंत्री महोदयांकडे दिनांक १० फेब्रुवारी, २०२५ रोजी वा त्यासुमारास केली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, प्लास्टर ऑफ पॅरिसला पर्याय न देता घालण्यात आलेल्या बंदीमुळे हजारो गणेश मूर्तिकार, कामगारांच्या उपजिविकेचा गंभीर प्रश्न निर्माण झाला आहे, हे ही खरे आहे काय;

(३) असल्यास, उक्त प्रकरणी गणेश मूर्तीकार यांनी केलेल्या मागणीनुसार पीओपीसारखे साधर्म्य असलेले साहित्य उपलब्ध करून देण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्रीमती पंकजा मुंडे (०७-१०-२०२५) : (१)अश्या स्वरुपाचे निवेदन मा.मंत्री, पर्यावरण व वातावरणीय बदल विभाग यांच्या कार्यालयाकडून प्राप्त झाले आहे.

(२), (३) व (४) केंद्रीय प्रदूषण नियंत्रण मंडळाच्या दिनांक १२ मे, २०२० च्या मार्गदर्शक सूचनांनुसार प्लास्टर ऑफ पॅरिस पासून बनविण्यात येणाऱ्या मूर्त्यांवर बंदी घालण्यात आली होती. केंद्रीय प्रदूषण नियंत्रण मंडळाच्या मार्गदर्शक सूचनांच्या अंमलबजावणीच्या अनुषंगाने मा.उच्च न्यायालय, मुंबई येथे जनहीत याचिका क्र. ९६/२०२४ व इतर न्यायालयीन प्रकरणे दाखल करण्यात आली आहेत.

मूर्ती तयार करण्यासाठी प्लास्टर ऑफ पॅरीसचा (पी. ओ. पी.) वापर आणि मूर्तीच्या विसर्जनामुळे जलस्रोतांवर होणारे परिणाम याबाबत शास्त्रीय दृष्ट्या अभ्यास करून शासनास शिफारस करण्याकरीता गठीत केलेल्या समितीचा अहवाल पर्यावरण व वातावरणीय बदल विभागास सादर केला होता.त्यानुसार पर्यावरण व वातावरणीय बदल विभागाकडून सदर अहवाल केंद्रीय प्रदूषण नियंत्रण मंडळाकडे अवलोकनार्थ व विचारार्थ पाठविण्यात आला होता.

केंद्रीय प्रदूषण नियंत्रण मंडळाने नेमलेल्या तज्ञ समितीच्या शिफारशी विचारात घेऊन मा.उच्च न्यायालयाने त्यांच्या दिनांक ९ जून, २०२५ रोजीच्या आदेशान्वये केवळ प्लास्टर ऑफ पॅरीस (पी.ओ.पी.) मुर्ती बनविण्यावरील बंदी उठविली होती. तथापि, राज्य शासनास प्लास्टर ऑफ पॅरीस (पी.ओ.पी.) मूर्ती विसर्जनाबाबत धोरण तयार करणेबाबत सूचना दिल्या होत्या.

त्यानुषंगाने पर्यावरण पूरक सण साजरे करण्याच्या अनुषंगाने प्लास्टर ऑफ़ पॅरीस (पी.ओ.पी.) मूर्ती विसर्जनाबाबतच्या मार्गदर्शक सूचना दिनांक दिनांक ०१ ऑगस्ट, २०२५ रोजीच्या शासन निर्णयान्वये निर्गमित करण्यात आले आहे.

मुंबईतील प्रदूषणात विषारी धूर सोडून वाढ करणाऱ्या वाहनांवर कठोर कारवाई करण्याबाबत

(११) २१२९ (२३-०४-२०२५) श्री.मिलिंद नार्वेकर, श्री.सुनिल शिंदे : सन्माननीय **परिवहन मंत्री**

पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) मुंबईतील हवेच्या गुणवत्तेचा दर्जा दिवसेंदिवस ढासळत असतानाच गत वर्षभरात सुमारे ६१ हजार ४४१ वाहनांच्या जुनाट व नादुरुस्त इंजिन असलेल्या वाहनातून निघत असलेल्या कार्बन मोनॉक्साइडसारख्या घातक वायुमुळे मुंबईकरांचे आरोग्य धोक्यात आले असल्याची बाब दिनांक ४ फेब्रुवारी, २०२५ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उक्त प्रकरणी चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले आहे आणि मुंबईतील प्रदूषणात घातक विषारी धूर सोडून वाढ करणाऱ्या वाहनांवर शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री.प्रताप सरनाईक (०७-१०-२०२५) : (१) हे अंशत: खरे आहे.
(२) मा.उच्च न्यायालय, मुंबई येथे दाखल Suo Motu PIL No. ०३/२०२३ मध्ये मा.न्यायालयाच्या निर्देशास अनुसरुन मुंबईतील प्रदूषण कमी करण्यासाठी समिती स्थापन करण्यात आली आहे. सदर समिती सदस्यांनी सुचविलेल्या वाहतूक मार्ग बदल, वाहनांना प्रवेश निर्बंध, वाहतूक कोंडी कमी करण्याचे उपाय, पर्यायी मार्ग इ. बाबींचे सर्वेक्षण करुन प्रदूषण कमी करण्यासाठी उपाययोजना सुचविणे ही बाब कार्यवाहीखाली आहे.
भारत स्टेज-०६ (BS-०६) मानांकनाच्या वाहनांची नोंदणी माहे एप्रिल, २०२० पासून सुरु झालेली आहे.
प्रादेशिक परिवहन कार्यालय, मुंबई (मध्य, पश्चिम, पूर्व) व बोरीवली कार्यालयाच्या वायुवेग पथकामार्फत वायुप्रदूषण प्रमाणपत्राची नियमित तपासणी करण्यात येऊन दोषी वाहनांवर कारवाई केली जाते.
तसेच वाहनातून एकसंघ नसलेला माल (उदा.- वाळु, मुरुम इ.) वाहतूक करताना तो आच्छादित न करता वाहतूक करणाऱ्या वाहनांची परिवहन विभागाच्या वायुवेग पथकामार्फत मुंबईतील जकात नाक्यांवर विशेष तपासणी मोहीम ऑक्टोबर, २०२३ पासून सुरु आहे.
(३) प्रश्न उद्भवत नाही.

पिंपरी चिंचवड येथील सेक्टर १२ मधील उभारलेल्या निवासी प्रकल्पातील तक्रारीबाबत

(१२) २५४१ (१८-०७-२०२५) श्री.योगेश टिळेकर : सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) पुणे महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाने पिंपरी चिंचवड येथील सेक्टर १२ येथे उभारलेल्या निवासी प्रकल्पामध्ये निकृष्ट दर्जाचे साहित्य वापरल्याच्या तक्रारी नागरिकांनी प्राधिकरणाकडे केल्या असल्याचे माहे एप्रिल, २०२५ मध्ये वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदरच्या इमारतीमध्ये पाणी गळती होणे, सोलर बंद पडणे अशा तक्रारी आल्या असून सदर तक्रारीबाबत प्राधिकरणाने चौकशी समिती नेमली आहे, हेही खरे आहे काय,
(३) असल्यास, सदर चौकशी समितीने तक्रारीचे निरसन करुन संबंधित बांधकाम व्यवसायीकावर कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री.एकनाथ शिंदे (०६-११-२०२५) : (१) होय खरे आहे.

(२), (३) व (४) हे खरे नाही.

प्राधिकरणाकडे प्राप्त झालेल्या तक्रारीच्या अनुषंगाने शासकीय अभियांत्रिकी महाविद्यालय तंत्रज्ञान विद्यापीठ, पुणे या त्रयस्थ संस्थेमार्फत इमारतीचे संरचनात्मक परिक्षक केले आहे. सदर गृहयोजनेतील इमारतीच्या कोणत्याही सरचनात्मक कमतरता / खराबी दिसून आलेली नाही. परंतु स्वच्छतागृह, स्नानगृहाच्या गळती, सौर यंत्रणा व डक्ट मधील नलिका गळती व पाण्याची टाकी च्या गळतीची दुरुती व आवश्यक कामे अशा त्रयस्थ संस्थेने सूचविलेल्या दुरुस्तीची कामे कंत्राटदाराकडून त्यांच्या स्वखर्चातून पूर्ण करुन घेण्यात आलेल्या आहेत.

राज्यातील विविध रुग्णालयांशी संलग्न असलेले वैद्यकीय साहित्य, उपकरणे रुग्णांना अल्पदरात उपलब्ध करुन देण्याबाबत

(१३) ३१८४ (१०-०७-२०२५) श्री.श्रीकांत भारतीय : सन्माननीय **वैद्यकीय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील विविध रूग्णालयांशी संलग्न असलेल्या औषधी दुकानदाराकडून रूग्णालयात दाखल असलेल्या रूग्णावरील उपचारासाठी लागणाऱ्या वैद्यकीय साहित्याची विक्री करताना रूग्णांच्या नातेवाईकांकडून बाजार भावापेक्षा उच्चदराने औषधाची/साहित्यांची विक्री होत असल्याची बाब माहे फेब्रुवारी, २०२५ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, युरिन बॅग, कॅथेटर, आयव्ही सेट, आयव्ही कॅथेटर, आयव्ही कॅन्युला, नेब्युलायझरसाठी लागणारे मास्क, पीडीया ड्रीप, बीटी सेट, सर्जिकल कापूस यांसारख्या वैद्यकीय साहित्य, उपकरणांची एमआरपी ही मूळ खरेदी किंमतीच्या जवळपास ५ ते १० पट अधिक असल्याची बाब देखील निदर्शनास आली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदरहू वैद्यकीय साहित्य, उपकरणे मूळ खरेदी किंमतीत रूग्णांना उपलब्ध करून देण्याबाबत रूग्णालयांशी संलग्न असलेल्या औषधी दुकानदारांना सक्तीचे करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली त्याचा तपशील काय आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री.हसन मुश्रीफ (०३-११-२०२५) : १), (२) व (३) केंद्र शासनाच्या Drugs (Prices Control) Order, २०१३ आदेशान्वये औषधे व वैद्यकीय उपकरणांच्या किंमतींवर नियंत्रण ठेवण्याचे अधिकार National Pharmaceutical Pricing Authority (NPPA) यांना आहेत, आणि त्याची राज्य पातळीवरील अंमलबजावणी अन्न व औषध प्रशासन, महाराष्ट्र राज्य मार्फत केली जाते.

वैद्यकीय शिक्षण व संशोधन संचालनालयाच्या अखत्यारीतील शासकीय वैद्यकीय महाविद्यालये व संलग्न रुग्णालयांमध्ये उपचारार्थ येणाऱ्या रुग्णांना मोफत औषधे उपलब्ध करून दिली जातात. तसेच, रुग्णालय परिसरात रुग्णांच्या सोयीसाठी बाह्यसंस्थेद्वारे जेनेरिक औषध केंद्र सुरू करण्यात आले असून, येथे रुग्णांना अल्पदरात औषधे व सर्जिकल साहित्य कमाल किरकोळ किंमतीपेक्षा कमी दरात उपलब्ध करून देण्यात येतात.

अन्न व औषध प्रशासन विभागामार्फत औषध विक्रीतील गैरप्रकारांवर आळा घालण्यासाठी विशेष तपासणी मोहिम राबविण्यात येत आहे. तपासणीदरम्यान औषध विक्रेत्यांकडून नियमांचे उल्लंघन आढळल्यास, त्यांच्या विरोधात कठोर दंडात्मक कारवाई करण्यात येत असून, अशा प्रकरणांमध्ये औषध विक्री परवाने निलंबित किंवा रद्द करण्याची कार्यवाही केली जाते.
(४) लागू नाही.

राज्यात जलयुक्त शिवार योजना राबविण्याकरीता अधिकारी/कर्मचारी यांची मंजूर पदे तात्काळ भरण्याबाबत

(१४) ३७६७ (१५-०७-२०२५) श्री.अमोल मिटकरी, श्री.विक्रम काळे, श्री.सतिश चव्हाण, श्री.शिवाजीराव गर्जे : सन्माननीय **मृद व जलसंधारण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्यात जलयुक्त शिवार योजना राबविण्याकरिता सन २०१७ मध्ये मंत्रीमंडळाने ९ हजार अधिकारी /कर्मचारी यांची पदे मंजूर करुन भरती करण्याचा निर्णय घेऊनही अद्यापही ही पदे भरण्यात आली नसल्याने सदर योजनेची प्रभावी अंमलबजावणी होत नसल्याचे माहे एप्रिल, २०२५ मध्ये वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, राज्यातील दुष्काळी परिस्थितीवर मात करण्यासाठी कायमस्वरुपी उपाययोजना म्हणून या विभागामार्फत राबविण्यात येणाऱ्या योजना सक्षमपणे पूर्ण करण्याकरिता तसेच उक्त मंजूर पदे भरण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री.संजय राठोड (२९-१०-२०२५) : (१), (२) व (३) दिनांक ३१/०५/२०१७ रोजीच्या शासन निर्णयान्वये मृद व जलसंधारण विभागांतर्गत आयुक्तालयाच्या स्थापनेसह क्षेत्रिय यंत्रणेचा आकृतिबंध मंजूर करण्यात आला. त्यानुसार कृषी विभागाकडून मृद व जलसंधारण विभागाकडे ९९६७ पदे वर्ग करण्याचा निर्णय घेण्यात आला होता. कृषी विभागाकडून दिनांक १२/०९/२०१७ रोजीच्या शासन निर्णयान्वये, एकूण २१८१ पदे या विभागास वर्ग करण्यास मान्यता देण्यात आली, प्रत्यक्षात सदरची पदे वर्ग करण्यात आलेली नाहीत. यास्तव उच्चस्तरीय सचिव समितीपुढे या विभागाचा स्वतंत्र आकृतीबंधाचा प्रस्ताव सादर करण्यात आला असता त्यास मान्यता मिळाली असून पुढील कार्यवाही सुरु आहे.

मौजा टाकरखेडा-धामंत्री (ता.आर्वी, जि.वर्धा) नदीवरील दोन जिल्ह्यांना जोडणारा पुल मंजूर करण्याबाबत

(१५) ४०४७ (१८-०७-२०२५) श्री.दादाराव केचे : सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) मौजा टाकरखेडा-धामंत्री (ता.आर्वी, जि.वर्धा) वर्धा नदीवरील दोन जिल्ह्यांना जोडणारा पुल CRF मधून मंजूर करण्याबाबतची मागणी स्थानिक लोकप्रतिनिधीनी मा.मुख्यमंत्री यांच्याकडे दिनांक २४ मे, २०२५ रोजी निवेदनाद्वारे केली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, मौजा टाकरखेडा व मौजा धामंत्री या दोन्ही ठिकाणी तिर्थक्षेत्र असल्यामुळे भाविकांची

पावसाळ्यामध्ये गैरसोय होत असून दोन्ही तिर्थक्षेत्रावरील भाविकांची गैरसोय टाळण्याच्या दृष्टीने दोन्ही जिल्ह्यांना जोडणारा पुलाच्या बांधकामास मंजुरी देण्याच्या दृष्टीने शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री.शिवेंद्रसिंहराजे अभयसिंहराजे भोसले (१४-१०-२०२५) : (१) होय, हे खरे आहे.
(२) व (३) पुलाचे काम निधी, निकष व प्राधान्यक्रमानुसार हाती घेण्याचे नियोजन राहील.

ठाणे खाडीमध्ये बेकायदा भराव आणि सांडपाणी यामुळे प्रदूषण वाढल्याबाबत

(१६) ४६२४ (२६-०८-२०२५) श्रीमती उमा खापरे : सन्माननीय **पर्यावरण व वातावरणीय बदल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) निसर्गाचे वरदान लाभलेल्या ठाणे खाडीत नाल्याचे घाणेरडे पाणी सोडण्यात येत असल्याने खाडीत अमोनिकल नायट्रोजनची पातळी वाढली असून त्यामुळे जलजीवन धोक्यात आले असल्याचा अहवाल ठाणे महानगरपालिकेने प्रसिध्द केला असल्याचे माहे एप्रिल,२०२५ च्या पहिल्या आठवड्यात वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर अहवालामध्ये खाडीत गेल्या अनेक वर्षापासून सुरू असलेल्या बेकायदा भराव आणि सांडपाणी यामुळे प्रदूषणात वाढ झाली असल्याने प्रदूषण रोखण्यासाठी व खाडीचे अस्तित्व टिकवून ठेवण्यासाठी शासनाने कोणत्या उपाययोजना केल्या आहेत वा करण्यात येत आहेत,
(३) नसल्यास विलंबाची कारणे काय आहेत ?

श्रीमती पंकजा मुंडे (२९-१०-२०२५) : (१) हे खरे नाही.

ठाणे महानगरपालिका यांच्याकडून प्राप्त अहवालानुसार ठाणे, नवी मुंबई भागातील नाले ठाणे खाडीमध्ये जाऊन मिळत असल्याने अमेनिकल नायट्रोजनची पातळी मर्यादेपेक्षा थोडी वाढलेली असली, तरी ठाणे क्षेत्रातील खाडीच्या पाण्यात विरघळलेला ऑक्सिजन केंद्रिय प्रदूषण नियंत्रण मंडळाच्या मानकांप्रमाणे योग्य असून त्यामुळे जलजीवन धोक्यात आले आहे ही बाब खरी नसल्याचे नमूद करण्यात आले आहे.

(२) व (३) महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाकडून प्राप्त अहवालानुसार ठाणे महानगरपालिका क्षेत्रातून सुमारे ३२७ एमएलडी घरगुती सांडपाण्याची निर्मिती होत असून महानगरपालिकेमार्फ़त एकूण ३१८ एमएलडी क्षमतेचे ०८ घरगुती सांडपाणी प्रक्रिया केंद्र कार्यान्वित आहेत. तसेच ठाणे महानगरपालिका क्षेत्रातील १८५ गृहसंकुलांनी ५२.८४ एमएलडी क्षमतेचे घरगुती सांडपाणी प्रक्रिया केंद्र उभारलेले आहेत.

महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाकडून प्राप्त अहवालानुसार ठाणे शहरातून एकूण ८३ नाले वाहत असून त्यापैकी काही नाल्यांच्या ठिकाणी घनकचरा नाल्यांमध्ये जाऊ नये याकरीता ठाणे महानगरपालिकाकडून जाळ्या सुध्दा बसविलेल्या आहेत.

खाडी व नाल्यांच्या ठिकाणी जलशुध्दीकरण प्रकल्प उभारण्याबाबत अमृत २.० योजना व सरोवर संवर्धन योजनेंतर्गत घरगुती सांडपाणी प्रक्रिया केंद्र उभारणीबाबतचे काम महानगरपालिकेमार्फ़त करण्यात येत आहे.

महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळामार्फ़त सर्व सांडपाणी प्रक्रिया केंद्रातील प्रक्रियाकृत घरगुती सांडपाण्याचे नमुने दरमहा संकलित करण्यात येत असून नमुन्यांची गुणवत्ता विहित मानकांच्या मर्यादेपेक्षा जास्त आढळून आल्यास महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळामार्फ़त संबंधितांना निर्देश देण्यात येतात.

मुंबईतील जम्बो कोविड सेटरच्या उभारणीत आर्थिक अनियमितता झाल्याबाबत

(१७) ९७५७ (१८-०६-२०२१) श्री.प्रविण दरेकर, ॲड.निरंजन डावखरे : सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबईतील जम्बो कोविड सेंटरच्या उभारणीत मोठ्या प्रमाणावर आर्थिक अनियमितता झाल्याच्या तक्रारी स्थानिक लोकप्रतिनिधींनी दिनांक १६ ऑक्टोबर, २०२० रोजीच्या पत्राव्दारे शासनाकडे केली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, कोविड सेंटरमधील फर्निचर व इतर साधनसामुग्री विकत घेण्याऐवजी दहापट अधिक दराने भाडे तत्वावर घेण्यात येणे, ऑक्सिजनयुक्त खाटांचे पुरवठा कंत्राट अनुभव नसलेल्या बिल्डरला बहाल करणे, यासारख्या गंभीर बाबी निदर्शनास आल्या आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय निष्पन्न झाले व संबंधिताविरुध्द कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री.एकनाथ शिंदे (०१-१०-२०२५) : (१) हे खरे आहे. तथापि, कोणत्याही तक्रारीमध्ये तथ्य आढळून आले नाही असे बृहन्मुंबई महानगरपालिकेने कळविले आहे.

(२), (३) व (४) सदर प्रकरणी खालीलप्रमाणे नमूद करण्यात येत आहे:- <u>बीकेसी कोविड-१९ रुग्णालय</u>

सदर रुग्णालय एमएमआरडीए मार्फत उभारण्यात आले असून, वांद्रे-कुर्ला संकुलाशेजारील धारावी या दाटीवाटीच्या परिसरात मोठ्या प्रमाणात कोरोना रूग्ण सापडत असल्याने रुग्णांना पर्याप्त वैद्यकीय सुविधा त्वरीत उपलब्ध करून देणे क्रमप्राप्त होते. अशा उद्भवलेल्या आपत्कालीन परिस्थितीमध्ये ई-निविदा, जेम पोर्टल इ. पध्दतीने करावयाच्या खरेदीस लागणारा जास्तीचा कालावधी आणि आपत्कालीन परिस्थिती व निकड विचारात घेता ई-निविदा ऐवजी केंद्र व राज्य शासन यांनी वेळोवेळी निर्गमित केलेले आपत्कालीन खरेदी संदर्भ विचारात घेऊन खरेदी करण्याचे प्रस्तावित करण्यात आले. उद्योग, ऊर्जा व कामगार विभाग, शासन निर्णय दिनांक १ डिसेंबर, २०१६ व केंद्र शासनाच्या अर्थ विभागाच्या मॅन्यअल फॉर प्रोक्युअरमेंट ऑफ गुड्स, २०१७ मधील संबंधित तरतुदींन्वये आवश्यक वैद्यकिय उपकरणे व सेवा यांची खरेदी/भाडेतत्वावर सेवा उपलब्ध करुन घेण्यात आली आहे. सदर खरेदी व भाडे तत्वावरील सेवा कोव्हिड-१९ मधील निमंत्रित तज्ञ सदस्य यांच्या मार्गदर्शन व शिफारशीनुसार खरेदी करण्यात आलेली आहे.

कोव्हिड-१९ विषाणू प्रसारावरील प्रतिबंधात्मक उपाययोजना म्हणून १,००० खाटांचे तात्पुरत्या स्वरुपातील रुग्णालय तयार करणे तसेच रुग्णालयासाठी वैद्यकीय व इतर आवश्यक साधनसामुग्री खरेदी करणे व सोयीसुविधा पुरविणे याकरीता वैद्यकीय क्षेत्रातील तज्ञांच्या समावेशासह अतिरिक्त महानगर

आयुक्त यांच्या अध्यक्षतेखाली समिती नियुक्त करण्यात आली होती.

प्राधिकरणातर्फे वांद्रे-कुर्ला संकुलात उभारण्यात आलेल्या कोव्हिड-१९ समर्पित केंद्रासाठी उपकरणे व साधनसामुग्री, रुग्णालयाचे स्थापत्य आणि विद्युत उपकरणे व आयटी उपकरणे यांसाठी एकूण सुमारे रुपये १९.९५ कोटी इतका खर्च आला आहे.

दहिसर व कांदरपाडा कोविड सेंटर

शासनाच्या सूचनेनुसार मुंबई मेट्रो रेल कॉर्पोरेशनमार्फत दहिसर व कांदरपाडा येथे कोविड सेंटर बांधण्यात आले आहे. बृहन्मुंबई महानगरपालिकेमार्फत नियुक्त केलेल्या वैद्यकीय सल्लागाराच्या सल्ल्याने आवश्यक असलेली वैद्यकीय साधन सामुग्री/सुविधा व संबंधित क्षेत्रात अनुभव असलेल्या कंत्राटदाराकडून प्रक्रियेचा अवलंब करत पूर्ण करण्यात आले. तसेच, कोविड-१९ मुळे लॉकडाऊनची गंभीर परिस्थिती आणि त्याकाळात वैद्यकीय सुविधेची नितांत आवश्यकता या बाबींचा विचार करता शीघ्रतेने प्रक्रिया पूर्ण करणे आवश्यक होते. त्यामुळे पारंपारिक निविदा प्रक्रियेचा अवलंब न करता वैद्यकीय सामुग्री पुरविण्याचा अनुभव असलेल्या १२ संस्थांकडून कोटेशन मागविण्यात आले. याबाबत वैद्यकीय सल्लागाराच्या मार्गदर्शनानुसार कोटेशनवर निगोशिएशन करुन दर कमी करुन संबंधित संस्थांना काम देण्यात आले. याच धर्तीवर कोविड सेंटरसाठी पाणीपुरवठा व मलनि:सारणाचे काम फॉर्मसना देण्यात आले.

मुलुंड जम्बो कोविड सेंटर

मुलुंड जम्बो कोविड सेंटर येथील जर्मन हॅगर स्टक्चर, खाटा, कॉन्टॅक्ट लेन्स क्लिनिक व सोफा भाडेतत्वावर घेण्यात आले आहे.

याव्यतिरिक्त बेड साईड लॉकर, पब्लिक अनाऊन्स सिस्टीम, वैद्यकीय उपकरणे, आय.सी.यु. खाटा, RO-UV वॉटर डिस्पेन्सर, आय.टी. उपकरणे, टी.व्ही. संच, सीसीटीव्ही प्रणाली, दूरध्वनी प्रणाली इत्यादी सिडकोने खरेदी केलेले आहे.

मुलुंड येथील हेल्थ सेंटरच्या उभारणीसाठी तातडीची बाब व "एक विशेष बाब" म्हणून खरेदी समिती गठीत करुन निविदा प्रक्रिया राबवून लघुत्तम कंत्राटदारामार्फत फर्निचर व इतर साधनसामुग्री खरेदी करण्यात आली होती / भाड्याने घेण्यात आली.

नॅशलन स्पोर्टस क्लब ऑफ इंडिया

सदर कोविड महासुविधा केंद्रामध्ये व्यावसायिक-सामाजिक बांधिलकीमार्फत गंभीर रुग्णांसाठी कंटेनर अतिदक्षता विभागाची उभारणी करण्यात आली. सदर केंद्राकरीता आवश्यक असलेले फर्निचर व साधनसामुग्री महापालिकेच्या मध्यवर्ती खरेदी खाते तसेच व्यावसायिक-सामाजिक बांधिलकीमार्फत पुरविण्यात आलेले आहे. सदर सुविधा केंद्रामध्ये कोणतेही फर्निचर वा इतर साधनसामुग्री भाडेतत्वावर घेण्यात आलेले नाही.

महालक्ष्मी रेसकोर्स

सदर ठिकाणी कोणतेही काम अनुभव नसलेल्या बिल्डरला देण्यात आलेले नाही. सदर काम हे निविदा मागवून लघुत्तम कंत्राटदाराची नियुक्ती करुन करण्यात आलेले आहे.

सदर काम नोव्हेंबर, २०२० पासून खंडीत करण्यात आले आहे.

रिचर्डसन व क्रुडास जम्बो कोविड सेंटर

सदर ठिकाणी फर्निचर भाडेतत्वावर घेण्यात आलेले नाही. तसेच ऑक्सिजनयुक्त खाटांचा पुरवठा करण्याचे कंत्राट कोणत्याही बिल्डरला देण्यात आलेले नाही.

नेस्को कोविड सेंटर

सदर ठिकाणी कामे योग्य दराने समाधानकारकरित्या अत्यंत तातडीने मे. रोमेल रिॲल्टर्स यांच्याकडून करुन घेण्यात आली आहेत.

राज्यातील नागरी क्षेत्रातील धर्मदाय आयुक्तांकडे नोंदणी असलेल्या शैक्षणिक संस्थांना मालमत्ता करातून सूट मिळणेबाबत

(१८) १७१२५ (२५-०३-२०२३) श्री.किरण सरनाईक, श्री.जयंत आसगावकर : सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील नागरी क्षेत्रातील धर्मदाय आयुक्तांकडे नोंदणी असलेल्या शैक्षणिक संस्थांना मालमत्ता करातून सूट देण्यात येत नसल्याची बाब माहे जानेवारी २०२३ च्या पहिल्या आठवड्यात निदर्शनास आली हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनामार्फत चौकशी करण्यात आली आहे काय,

(३) असल्यास, चौकशीत काय आढळून आले, तद्नुसार राज्यातील नागरी क्षेत्रातील धर्मदाय आयुक्तांकडे नोंदणी असलेल्या शैक्षणिक संस्थांना मालमत्ता करातून सूट मिळणेबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री.एकनाथ शिंदे (०४-०३-२०२५) : (१) हे खरे नाही.

राज्यातील नागरी स्थानिक स्वराज्य संस्थेमधील ज्या शैक्षणिक संस्थाची नोंदणी धर्मदाय आयुक्त यांच्याकडे करण्यात आलेली आहे अशा संस्थाना महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम १३२ (ब) अन्वये मालमत्ता करातून सूट देण्याची तरतूद आहे तसेच महाराष्ट्र नगरपालिका (एकत्रित मालमत्ता कर) नियम १९६९ चे नियम १० (२) अन्वये ५० टक्के सूट देण्याची तरतूद आहे. त्याअनुषंगाने नागरी स्थानिक स्वराज्य संस्था आपल्या स्तरावरुन सूट देतात.

मुंबई महानगरपालिका अधिनियम १८८८ मधील कलम १४३, कलम १४३(१), कलम १४३(२) अन्वये शैक्षणिक संस्थांना मालमत्ता करातून सूट देण्यात येते. सदर तदतुदीनुसार खाजगी अनुदानित तसेच विनाअनुदानित शैक्षणिक संस्था यांचे धर्मदाय आयुक्त यांचेकडे नोंदणीकृत असणे आवश्यक आहे. आवश्यक कागदपत्रांची पुर्तता केल्यानंतर त्यांना मालमत्ता करातून सूट देण्यात येते.

(२), (३) व (४) प्रश्न उद्‌भवत नाही.

कोल्हापूर जिल्ह्यासह राज्यातील आश्रमशाळातील शिक्षकांचे थकीत वेतन नियमित देण्याबाबत

(१९) १९२२० (०८-०८-२०२३) श्री.जयंत आसगावकर, श्री.किरण सरनाईक : तारांकित प्रश्न क्रमांक १७५७६ ला दिनांक ९ मार्च, २०२३ रोजी दिलेल्या उत्तराच्या संदर्भात सन्माननीय **इतर मागास बहुजन कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) कोल्हापूर जिल्ह्यातील विमुक्त जाती - भटक्या जमाती प्राथमिक व माध्यमिक आश्रमशाळातील शिक्षकांचे वेतन प्रलंबित तसेच नियमित होत नसल्यामुळे येथील शिक्षकांना अनेक अडचणींना सामोरे जावे लागत आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, इतर मागास व बहुजन कल्याण विभागांतर्गत विजाभज आश्रम शाळेतील कर्मचाऱ्यांचे वेतन महिन्याच्या ०१ तारखेला अदा होत नसल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, या संदर्भात शासनाने माहिती घेऊन येथील शिक्षकांचे प्रलंबित वेतन तातडीने अदा करणेबाबत व राज्यातील सर्व आश्रमशाळांतील शिक्षकांचे वेतन नियमित व वेळेवर अदा करणेबाबत कोणती कार्यवाही केली आहे वा करण्यात येत आहे ?
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री.अतुल सावे (२७-१०-२०२५) : (१) खरे नाही.
(२) व (३) अंशत : खरे आहे.
या विभागाचे शासन परिपत्रक क्र. विभशा-२०१८/ प्र.क्र.११९/ विजाभज-२, दिनांक १६/०५/२०१८ अन्वये राज्यातील सर्व आश्रमशाळांतील शिक्षक / शिक्षकेतर कर्मचारी यांचे वेतन प्रत्येक महिन्याच्या ०१ तारखेस अदा करण्याबाबत सूचना निर्गमित करण्यात आलेल्या आहेत. काही वेळेस निधी उपलब्ध नसल्याने ०१ तारखेस वेतन अदा करण्यास अडचणी येतात. परंतु, वित्त विभागाकडून निधी प्राप्त होताच वेतन अदा करण्याची कार्यवाही करण्यात येते.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

नागपूर रेल्वे सुरक्षा दलाने आंध्रप्रदेश, छत्तीसगड या भागातून आणलेला गांजा जप्त करण्यात आल्याबाबत

(२०) २४२८६ (२२-०७-२०२४) श्री.अभिजित वंजारी, श्री.सतेज ऊर्फ बंटी पाटील : सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) नागपूर येथील रेल्वेक्षा सुरक्षा दलाने गत वर्षी आंध्रप्रदेश, छत्तीसगड या भागातून आणलेला गांजा जप्त केला असून उत्तरेकडील राज्यांकडून सर्व प्रकारच्या रेल्वे वाहतूकीतून गांजा आणि अन्य नशेचे पदार्थ येत असल्याचे माहे मार्च, २०२४ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उक्त प्रकरणी चौकशी शासनाने केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व चौकशीच्या त्यानुषंगाने रेल्वे वाहतूकीतून गांजा आणि अन्य पदार्थ तस्करी करणाऱ्यांवर कोणती कारवाई केली तसेच अशा प्रकारच्या घटनांवर प्रतिबंध घालण्यासाठी राज्य उत्पादन शुल्क विभागाने कोणती उपाययोजना वा कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री.देवेंद्र फडणवीस (२९-१०-२०२५) : (१) हे खरे आहे.
(२) रेल्वे वाहतुकीतून गांजा येत असल्याने अनुषंगाने लोहमार्ग पोलीस ठाणे, नागपूर येथे अप.क्रमांक

३०२/२०२४ कलम २०(b), २०(b) (ii) एनडीपीएस ॲक्ट अन्वये गुन्हा नोंद करण्यात आला आहे. सदर गुन्ह्यात एका आरोपीस अटक करण्यात आले असून त्याच्याविरूध्द दिनांक १३/०५/२०२४ रोजी मा.न्यायालयात दोषारोपपत्र दाखल केले आहे.

तसेच अप क्र. ३३१/२०२४ कलम २०(b)(ii) एनडीपीएस ॲक्ट अन्वये गुन्हा नोंद करण्यात आला असून सदर गुन्ह्याचा पुढील तपास चालू आहे.

रेल्वेतून अंमली पदार्थ वाहतुकीवर आळा घालण्यासाठी अंमली पदार्थ विरोधी पथक तयार करून रेल्वे सुरक्षा बल यांचेसोबत समन्वय साधून संवेदनशील गाड्या, स्टेशनवर गस्त घालण्यात येते. तसेच त्यादरम्यान कोणी संशयीत आढळून आल्यास तात्काळ गुन्हा दाखल करण्यात येतो.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

विधान भवन : **डॉ.विलास आठवले**
नागपूर. **सचिव-३,**
महाराष्ट्र विधानपरिषद.

मुद्रणपूर्व सर्व प्रक्रिया महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालयाच्या संगणक यंत्रणेवर करण्यात आली आहे.
मुद्रण: शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय, नागपूर.